



# IF YOU SEE ANYONE WITHOUT A HAND...

...Do extend them a helping hand!



**Give a hand that is simple and functional!**

Advanced, Easy, Quick
The LN-4 Prosthetic Hand!

**Suitable for those having at least 4" (10 cms.) of arm below the elbow.**

Suitable for children as well as adults.

**...LN-4 Hand is FREE!!!**
**and maintenance Free too**




**GIFT OF MOBILITY**
**A joint project of Rotary Club of Poona Downtown & Maharashtra Arogya Mandal**

**Every Saturday** between **2 pm. & 5 pm.**

**Sane Guruji Arogya Kendra,**
Malwadi, Hadapsar, Pune 411028

Contact: (020) **26999405 / 26999358**

| | |
|---|---|
| **098815 76362** | Madhav Padwal |
| **098812 56970** | Amol Zagade |
| **098900 11881** | Jitu Mehta |
| **098230 17457** | Shabbir Jamnagarwala |



MAHARASHTRA AROGYA MANDAL, PUNE
1960

Rotary

ROTARY INTERNATIONAL

# हडपसरला मुलांसाठी कोविड सेंटर

## 'सकाळ रिलीफ फंड', 'रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१' यांच्या सहकार्याने उपक्रम

**मांजरी, ता. १९ :** 'सकाळ रिलीफ फंड' व 'रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१' यांच्या संयुक्त सहकार्याने हडपसर येथील महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या साने गुरुजी रुग्णालयात लहान मुलांसाठी स्वतंत्र कोविड सेंटर सुरू करण्यात आले आहे.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या गव्हर्नर रोटरियन रश्मी कुलकर्णी यांच्या उपस्थितीत किशोर देसाई फाउंडेशनचे किशोर देसाई यांच्या हस्ते सेंटरचे उद्घाटन झाले. रोटरीचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर विनय कुलकर्णी, देसाई फाउंडेशनचे सिद्धार्थ देसाई, भाग्यश्री देसाई, अमृता देसाई, संजना देसाई, 'सकाळ सोशल फाउंडेशन'चे सतीश देसाई, शैलेश गुजर, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव अनिल गुजर, डॉ. सुशील देशमुख, डॉ. प्रणिता जोशी-देशमुख, प्रोजेक्ट कन्व्हेअर सुदिन आपटे, सहाय्यक पराग मुळे, मकरंद फडके आदी या वेळी उपस्थित होते.



**हडपसर : साने गुरुजी रुग्णालयात मुलांसाठी सुरू केलेल्या कोविड सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी (डावीकडून) डॉ. सतीश देसाई, रश्मी कुलकर्णी, विनय कुलकर्णी, डॉ. शैलेश गुजर, भाग्यश्री देसाई, किशोर देसाई, अनिल गुजर आणि सिद्धार्थ देसाई.**

या सेंटरमध्ये एन. एन. देसाई पेडियाट्रीक वॉर्ड व रोटरी पेडियाट्रीक कोविड इनिशिएटिव्ह अशा नावाने हा विभाग सुरू करण्यात आला आहे. या केंद्रामध्ये अत्याधुनिक यंत्रणेसह सात ऑक्सिजन, तर तीन व्हेंटिलेटर बेडची सुविधा आहे, अशी माहिती डॉ. देशमुख यांनी दिली.

किशोर देसाई म्हणाले, ''विश्वासार्ह व्यक्ती आणि संस्थांच्या माध्यमातून हे काम पुढे आल्याने काळजी नव्हती. त्यामुळे ही मदत करण्याचे आम्ही ठरविले. केवळ कर्तव्य म्हणून नाही तर मनातून मदत झाली पाहिजे, या भावनेने फाउंडेशनचे मदतीचे काम सुरू आहे.''

रोटरियन कुलकर्णी म्हणाल्या, ''रोटरीचे १४० क्लब जिल्ह्यात काम करीत आहेत. या वर्षात १५ कोटींची कामे केली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कोविड व इतर आरोग्याच्या उपक्रमांना प्राधान्य दिले आहे.''

''महाराष्ट्र आरोग्य मंडळ साने गुरुजी रुग्णालयाच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवीत आहे. येत्या काळात महिलांच्या कॅंसरबाबत काम करणार आहे. यासाठी संस्थांनी सहकार्य केल्यास मोठे काम करता येईल,'' अशी अपेक्षा महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव गुजर यांनी व्यक्त केली.

सर्वसामान्य माणसाला आपत्तीकाळात मदत करायचा 'सकाळ'चा कायमच प्रयत्न राहिला आहे. मराठी माणसाचा 'सकाळ'वर विश्वास आहे. या विश्वासावरच मदतीचे हे काम सुरू असल्याचे डॉ. सतीश देसाई यांनी सांगितले.

लोकमत

# कर्करोग प्रतिबंधक लसीकरण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**हडपसर :** महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर माळवाडी येथे ९ ते १३ गटात ४८ व १८ ते ४५ या गटात ४२९ वयोगटातील मुली व महिलांना गर्भाशय मुखाचा कर्करोग प्रतिबंधक लस देण्यात आली. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे, सेंटर फॉर एक्सलन्स फॉर मदर अ‍ॅन्ड चाइल्ड केअर व रोटरी क्लब पुणे सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ लक्ष्मी रोड, रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो यांच्या सहयोगाने हा उपक्रम झाला.

नगरसेविका हेमलता मगर यांच्या हस्ते व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव अनिल गुजर, रवि कपूर, दीपा भागवत, मकरंद फडके, डॉ. सुशीलकुमार देशमुख, डॉ. प्रणिता जोशी देशमुख, डॉ. मनीषा जगताप, डॉ. कमलाकर गजरे, मुख्याध्यापक सुरेश गुजर यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. लसीचा पहिला डोस या दिवशी देण्यात आला. एकूण ४७७ विद्यार्थिनी व महिलांनी लसीकरणाचा लाभ घेतला. लसीकरणाची कार्यवाही साने गुरुजी रुग्णालय व साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिरांतील स्वयंसेवकांनी केली. या लसीचा दुसरा डोस दोन महिन्यांनंतर देण्यात येणार आहे.

Hello Pune
Page No. 5 Mar 26, 2021
Powered by: erelego.com

Rotary
District 3131

Rotary Opens Opportunities

# Invitation

Rotary District 3131 is establishing first in Pune, a dedicated Paediatric Covid Center at Sane Guruji Arogya Kendra, Hadapsar.

**You are invited to attend its inauguration !**




*in association with*

## Sane Guruji Arogya Kendra

Hadapsar, Pune

## On Friday, 18th June 2021 at 4.30pm on

ZOOM
**Zoom ID : 842 6878 9921**
**Password : kids**

**Chief Guest**

**Shri Prataprao Pawar**
*CMD, Sakal Papers*

**Guests of Honor**

**Shri Kishor Desai**
*CMD, Kishor Pumps*

**Shri Satish Desai**
*Trustee, Sakal Foundation*

21020-D


***Looking forward to meet you and club members virtually !***

**Rtn Rashmi Kulkarni**
*District Governor*
*RY 20/21*

**Rtn Sudin Apte**
*District Secretary*
*Director - Thrust Area Projects*

Covid Thrust Projects Advisors
**PDG Vinay Kulkarni, PDG Abhay Gadgil, PDG Dr Girish Gune, PDG Subodh Joshi, Rtn Dr Rajendra Gosavi**

Host Clubs
**RC Pune Pristine, RC Pune Pride**
**RC Pune Metro, RC Pune Westend**



# Rotary Club of Pune Metro
and
# Maharashtra Arogya Mandal

invite you to the handover function
of the ICU Upgradation Project
Carried out under
Rotary Global Grant, GG 2122358
Rotary Year 2020-2021 & 2021-2022

Chief Guest **Rtn. Rashmi Kulkarni,**
*Immediate Past DG, District 3131*

Saturday, 18th December 2021 at 2 pm
**Venue:** Sane Guruji Hospital,
Hadapsar, Pune

---

**Rtn Sneha Subhedar**
*President, Rotary Club of Pune Metro*
**Shri. Anil S. Gujar**
*Secretary, Maharashtra Arogya Mandal*

---

**Participating Rotary Clubs & Districts**
RC Pune Metro, RC Pune Shivajinagar, RC Pune Katraj, RC Detroit,
RC Ann Arbor North RID 3131, RID 6380, RID 6400

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे

# साने गुरुजी आरोग्य केंद्र

माळवाडी, हडपसर, पुणे ४११०२८.



# साने गुरुजी आरोग्य केंद्रामध्ये ४७,५७९ कोविड प्रतिबंधक लसीकरण




महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर हे समाज कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिले आहे. कोरोना काळामध्ये संस्थेच्या साने गुरुजी आरोग्य केंद्रामध्ये दिनांक १२ फेब्रुवारी २०२१ पासून लसीकरण सुरु झाले. सुरुवातीला **फ्रंट लाईन वर्कर** याअंतर्गत आरोग्य सेवक, पोलीस कर्मचारी, बस चालक-वाहक, शिक्षक, महापालिकेचे कर्मचारी यांचे लसीकरण करण्यात आले.

दिनांक १० मार्च २०२१ पासून १८ ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये माफक दरात कोविड लसीकरण करण्यात आले.

दिनांक २४ ऑगस्ट २०२१ पासून **'वज्रनिर्धार योजनेअंतर्गत'** महाराष्ट्र आरोग्य मंडळ, बाळासाहेब देवरस पॉलिक्लिनीक, पुणे प्लॅटफॉर्म फॉर कोविड रिस्पॉन्स, जनसेवा न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने **मोफत लसीकरण** सुरु करण्यात आले आहे. या लसीकरणामध्ये **महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या विविध विभागीय कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला आहे.**

साने गुरुजी आरोग्य केंद्रामध्ये **दिनांक ७ डिसेंबर २०२१ पर्यंत एकूण ४७,५७९ पहिला व दुसरा डोस** घेतला. हे **मोफत लसीकरण** आजही साने गुरुजी आरोग्य केंद्रात सुरु असून नागरीकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे सचिव **श्री. अनिल गुजर** यांनी केले.

## लसीकरणाची काही क्षणचित्रे







**लसीकरण करा, कोरोनाला प्रतिबंध करा..**



# साने गुरूजी आरोग्य केंद्रात अद्ययावत नेत्र शस्त्रक्रिया उपकरणे

## 'रोटरी'कडून हस्तांतरण सोहळा

**हडपसर, दि. १८ (प्रतिनिधी) -** महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे साने गुरूजी आरोग्य केंद्र, हडपसर आणि रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी इंटरनॅशनल ग्लोबल ग्रँट अंतर्गत ४१ लक्ष रुपयांचे अद्ययावत नेत्र शस्त्रक्रिया उपकरणे हस्तांतरण साने गुरूजी आरोग्य केंद्रातील नेत्र विभागास करण्यात आले.

डॉ. राजेश पवार आणि प्रास्ताविक डॉ. प्रविण भट यांनी केले. रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटीचे रोटरीयन संदेश सावंत यांनी ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट विषयी माहीती दिली. उपकरणांविषयी सविस्तर माहिती डॉ. राजेश पवार आणि नेत्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. निलाक्षी प्रधान यांनी दिली. तर, महाराष्ट्र आरोग्य मंडळ राबवित असलेल्या विविध उपक्रमांबाबत संस्थेचे सचिव अनिल गुजर तसेच सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रणिता जोशी-देशमुख यांनी माहिती दिली.

कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव अरूण गुजर, अध्यक्ष डॉ. आशुतोष दुबे तसेच रोटरीयन संदेश सावंत, रोटरीयन समीर गुप्ते, रोटरीयन ब्रीज सेठी, डॉ. निलाक्षी प्रधान, डॉ. प्रविण भट व डॉ. शामली पावसे उपस्थित होते. संस्थेचे सहसचिव अरूण गुजर यांनी आभार मानले.

Handover function of ICU Upgradation Project carried out by 5 Rotary Clubs in 3 Rotary Districts of 2 countries

SAT DEC 18- 1400 hrs at Sane Guruji Hospital Hadapsar